23 AUG 2016

Modern College of Arts, Science & Commerce, Ganeshkhind, Pune-16

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी परिक्षा फी चा लाभ मिळणेसाठी कागदपत्रे तयार ठेवणेबाबत आवाहन.

---

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी चा लाभ दिला जातो.

त्यासाठी शासनाने https://mahaeschol.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ सुरु केले असून, त्याव्दारे विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरता येतो. त्यासाठी खालील कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. इयत्ता दहावी / बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व गुणपत्रिका / मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेची गुणपत्रिका.
२. जातीचा दाखला.
३. जाती प्रमाणपत्र पडताळणी दाखला.
४. आधारकार्ड क्रमांक.
५. ज्या राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडले आहे तो बँक खाते क्रमांक, बँकेचा चा IFSC कोड, MICR कोड.
६. बँक खाते क्रमांक आधारकार्डाशी संलग्न करणे.
७. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला.
८. पासपोर्ट आकाराचा फोटो.
९. पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा केली जाते. त्यासाठी बँक खाते क्रमांक व आधारकार्ड क्रमांक.

पात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क त्यांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे, त्या महाविद्यालयाच्या बँक खात्यावर परस्पर जमा केले जाते.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षीच विद्यार्थ्यांना अर्ज करावा लागेल, त्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही.

तेंव्हा विद्यार्थ्यांना व पालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वरील कागदपत्रांची पुर्तता करुन घेवून ती तयार ठेवावीत, जेणेकरुन ऐनवेळी धावपळ होणार नाही.

सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शिष्यवृत्तीची वेबसाईट सुरु केली जाईल, त्यासाठी वरील संकेतस्थळाच्या संपर्कात रहावे.

**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२६५२ / २६१३७१८६.

23 AUG 2016

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परीक्षा फी चा लाभ मिळणेसाठी कागदपत्रे तयार ठेवणेबाबत आवाहन.

---

**विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.**

१. दहावी /बारावी उत्तीर्ण प्रमाणपत्र व गुणपत्रिका /मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका.
२. जातीचा दाखला.
३. जाती प्रमाणपत्र पडताळणी दाखला .
४. आधारकार्ड क्रमांक.
५. ज्या राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडले आहे तो बँक खाते क्रमांक, बँकेचा IFS कोड, MICR कोड
६. बँक खाते क्रमांक आधारकार्डाशी संलग्न करणे.
७. सक्षम अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला.
८. पासपोर्ट आकाराचे फोटो.

- पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा केली जाते. यासाठी बँक खाते क्रमांक व आधार क्रमांक अत्यावश्यक आहे.
- पात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क त्यांनी ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे त्या महाविद्यालयाच्या बँक खात्यावर परस्पर जमा केले जाते.
- अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षीच विद्यार्थ्यांना अर्ज करावा लागेल, त्यानंतर अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही.

तेव्हा विद्यार्थ्यांना व पालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वरील कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन ती तयार ठेवावीत, जेणेकरुन ऐनवेळी धावपळ होणार नाही.

सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर शिष्यवृत्तीची वेबसाईट सुरु केली जाईल, त्यासाठी वरील संकेतस्थळाशी संपर्कात रहावे.

**(रनजित सिंह देओल)** भा.प्र.से.
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

23/8/16

JRN/Note

23 AUG 2016

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१

# जाहिरात

## केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७

राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये २०१६-१७ साठी ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. **फक्त ऑनलाईन (Online) पद्धतीने भरलेले अर्जच स्वीकारले जातील. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Ofline) अर्ज स्वीकारण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.** शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता ४८३०२ संच (Quota) निर्धारित केलेले असून त्यातील ३०% संच मुलींसाठी राखीव आहेत. नूतनीकरणासाठी संच निर्धारित नसतात. सन २०१४-१५ पासून सदर शिष्यवृत्तीचा निधी १००% केंद्र शासनाकडून वितरित करण्यात येतो.

### ♦ किमान पात्रता व अटी :

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/ स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.०० लाखच्या वर नसावी.
६) एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करून शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/ वसूल केली जाईल.
८) विद्यार्थ्यांनी आधार कार्ड सादर करणे अनिवार्य राहील.
९) विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयीकृत (Nationalise) बँकेत स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे. तसेच हे खाते आधार कार्डशी संलग्न (link) करणे आवश्यक आहे.

### ♦ अर्ज करण्याची पद्धत (नवीन मंजुरी/ नूतनीकरण) :

१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.
३) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/ संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

### ♦ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०१६-१७ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक

| क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) | नूतनीकरण (Renewal) |
| १ | इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३१ ऑगस्ट १०१६ पर्यंत | |
| २ | आय.टी.आय., डिप्लोमा, बी.एड., एम.फिल, पीएच.डी., पदवी, पदव्युत्तर यासारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत | |

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या नवीन प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी **www.scholarships.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. सदरचे संकेतस्थळ हे **www.minorityaffairs.gov.in** व **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाशी देखील जोडलेले (Link) आहे. तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथील दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

**(डॉ. धनराज माने)**
संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

डीजीआयपीआर/२०१६-२०१७/सी-२०१२

MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE
Ganeshkhind, Pune - 411016

# NOTICE

To be put up on To be removed on

## अल्पसंख्यांक(Post Matric) शिष्यवृत्ती – २०१६-१७

महाविद्यालातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मुस्लिम,शीख, बौध,पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील, अल्पसंख्यांक (Post Matric) शिष्यवृत्ती – २०१६-१७ साठी ऑनलाईन पद्धतीने नवीन **शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्ती नुतनीकरण (Renewal)** अर्ज भरण्यासाठी **www.scholarships.gov.in** हे संकेतस्थळ सुरु झालेले आहे. सदर संकेत स्थळावर विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून महाविद्यालयाच्या कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रांसह **दिनांक १५ आक्टोबर २०१६** पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**सोबत जोडलेल्या शासनाचे परीपत्रकानुसार ऑनलाईन अर्ज भरावेत.**

प्राचार्य

MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE
Ganeshkhind, Pune - 411016

# NOTICE

To be put up on | To be removed on

Class

## महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अथवा फ्रिशीपचा लाभ मिळणेसाठी कागदपत्रे तयार ठेवणेबाबत अवाहन

महाविद्यालयातील प्रथम वर्ष पदवी व प्रथम वर्ष पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या SC,NT,OBC & SBC विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शिष्यवृत्ती अथवा फ्रिशीपचा अर्ज भरण्यासाठी पुढील प्रमाणे कागदपत्रे तयार ठेवावीत.

१) १०वी,१२ वी गुणपत्रिका/मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेची गुणपत्रिका
२) जातीचा दाखला, **LC**झेरॉक्स **/TC** झेरॉक्स
३) जाती प्रमाणपत्र पडताळणी दाखला
४) आधारकार्ड
५) विद्यार्थ्याचे स्वत:चे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे
**(आई,वडील,बहीन,भाऊ यांचे खाते चालणार नाही)**
६) बँक खाते क्रमांक आधारकार्डाशी संलग्न करावे
७) सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला
**(उत्पन्न दाखल्याचे टोकण, तलाठ्याचा उत्पन्न दाखला चालणार नाही)**
८) पासपोर्ट आकाराचा फोटो
**९) OBC,NT आणि SBC साठी नॉनक्रिमेलेअर अत्यावश्यक आहे**

**संकेतस्थळ** **https:/mahaeschool.maharashtra.gov.in**

प्राचार्य